बुधवार, २० एप्रिल २०२२

तरुण भारत

# दोडामार्ग महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती



दोडामार्ग: हळबे महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना प्राध्यापक व सोबत विद्यार्थी.

वार्ताहर
दोडामार्ग

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत ढेपे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन केले. त्यानंतर दिलीप बर्वे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची किती गरज आहे, यावर व्याख्यान दिले. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी विद्यार्थ्यांना वाचनातून ज्ञानग्रहण करण्याचा संदेश दिला व जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रा. डॉ. दिलीप बर्वे तर आभार प्रा. डॉ. सोपान जाधव यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.